वर्ष : ०४ | अंक: ४७ | मुंबई, मंगळवार १६ ऑक्टोबर २०१८ ते २२ ऑक्टोबर २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 गुटखा विक्रेत्यांवर ‘आयपीसी’ अंतर्गत कारवाई

3 → '#Me Too'चे नवे वादळ

मोदी सरकारच्या ४ वर्षात भूकबळीत मोठी वाढ ← 4

## मीरा-भाईदरमध्ये गरब्याचा दणदणाट
# नियम धाब्यावर पोलिसांचेही दुर्लक्ष



**मीरा रोड - गरबा, दांडियासाठी ध्वनिक्षेपक व वाद्यवृंद वाजवण्यासाठी रात्री १० च्या वेळेची मर्यादा असताना मीरा भाईदरमध्ये मात्र रात्री ११ वाजले तरी दणदणाट सुरू असतो. उघडपणे ध्वनी प्रदूषण कायद्यासह उच्च न्यायालयाच्या आदेशांवर आयोजकांकडून आवाज वाढवला जात आहे. पोलिसांनीच ध्वनीप्रदूषण करण्यासाठी रात्री ११ ची वेळ तडजोडीत दिली असून काही ठिकाणी तर तक्रार येणार नाही याची काळजी घ्या असे सल्लेही दिल्याचे समजते. निवासी, रूग्णालय क्षेत्रात आवाजाची मर्यादा सर्रास ओलांडली जात असताना सामान्य नागरिकांना मात्र मुकाट्याने हा त्रास सहन करावा लागत आहे.**

पुढीलवर्षी होणाऱ्या निवडणुका पाहता यंदा शहरात गरबा - दांडियावर राजकीय रंग चढला आहे. राजकारणी व लोकप्रतिनिधींमध्ये तर गरब्यासाठी वेगवेगळे गायक व कलाकार आणणे, बक्षिसं यात स्पर्धाच लागली आहे. वाद्यवृंद,डीजेसारख्या कानठळ्या बसवणाऱ्या ध्वनीयंत्रणांचा दणदणाट चालला आहे. कानठळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे नागरिक त्रासले आहेत. रात्री दहा वाजता ध्वनिक्षेपक बंद होईल अशी त्यांची आशाही फोल ठरली आहे. या विरोधात तक्रार केल्यास पोलिसांकडून आयोजकांना नाव सांगितले जाण्याची भीती व पुन्हा त्यांचा दबाव या धास्तीने सामान्य नागरिक तक्रार करण्यास धजावत नाहीत.

काही ठिकाणी तर उशिरापर्यंत दणदणाट सुरू असतो. पोलिसांनी स्वत:हून गस्त घालून रात्री दहानंतर ध्वनिप्रदूषण करणाऱ्या ध्वनिक्षेपक वा ध्वनीयंत्रणांसह आयोजकांवर कारवाईची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. शिवाजीराव राठोड यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# गुंडांना घेऊन पक्ष विस्तार करणाऱ्यांकडून काय अपेक्षा करणार?

## उद्धव ठाकरेंचं भाजपावर शरसंधान



### मुंबईसह राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरुन देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र

**मुंबई: शिवसेना आमदार तुकाराम काते यांच्यावर झालेल्या हल्ल्यावरुन आणि राज्यातील गुन्हेगारीवरुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी भाजपावर शरसंधान साधण्यात आलं आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार लेकी-सुनांना पळवून न्यायची भाषा करतात. त्यांना पोलिसांचे संरक्षण मिळते, पण ‘मेट्रो’च्या झुंडशाहीवर जाब विचारणाऱ्या आमदार कातेंवर खुनी हल्ला होतो. अर्थात गुंड व गुन्हेगारांना घेऊन जे पक्ष विस्तार करीत आहेत त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा करावी?, अशा शब्दांमध्ये ठाकरेंनी भाजपावर तोफ डागली आहे.**

**“पोलिसांचा दरारा व कायद्याचा धाक असल्यानेच मुंबई सुरक्षित राहिली, पण गेल्या दोन-चार वर्षांत मुंबईची जास्त वाट लागली आहे. सर्वच बाबतीत मुंबईवर जे अधिकारी लादले गेले ते फक्त ओरबडण्यासाठी व वाट लावण्यासाठीच. कमवा आणि शिका या उक्तीप्रमाणे ओरबाडा, स्वतःच्या खिशात घाला व आमच्याही झोळीत टाका हा नवा ‘समृद्धी मार्ग’ सर्वच सरकारी खात्यांत सुरू झाला. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेबरोबर मुंबईचा विकास, भलेपणाही संपला. मुंबई-महाराष्ट्राशी वर्षानुवर्षे संपर्क नसलेल्या अधिकाऱ्यांच्या हाती राज्य देणे हा जनतेच्या जिवाशी खेळ आहे.**

राज्यातील वाढती गुन्हेगारी, नागपूरपाठोपाठ मुंबईत वाढलेल्या गुन्हेगारीच्या घटना यावरुन उद्धव ठाकरेंनी भाजपावर टीकेची झोड उठवली आहे. ‘शिवरायांच्या महाराष्ट्राच्या अधोगतीची ही सुरुवात आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नाही. पोलिसांना पक्ष कार्यकर्त्यांचा दर्जा व पक्षातील वाल्यांना कायदा-सुव्यवस्थेचे रखवालदार बनवले गेले आहे. त्याचा परिणाम नागपुरात व आता मुंबईतही दिसत आहे. राज्याच्या भवितव्यासाठी हे चित्र चांगले नाही,’ अशी टीका शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या ‘सामना’मधून करण्यात आली आहे. ‘मुख्यमंत्री फडणवीस व त्यांचे सरकार मान्य करणार नाही, पण मुंबईसह महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्थेचे काही बरे चाललेले नाही. भीमा-कोरेगाव दंगल व त्यानंतर पुकारलेल्या ‘बंद’मध्ये प्रचंड हिंसाचार झाला. पोलिसांनी त्यावेळी बघ्याची भूमिका घेतली. मध्यंतरी झालेल्या मराठा क्रांती आंदोलनातही काही ठिकाणी हिंसक घटना घडल्या. आता मुंबईत दिवसाढवळ्या खून व हिंसक हल्ले सुरू झाले आहेत. मुंबईत मानखुर्दचे शिवसेना आमदार तुकाराम काते यांच्यावर समाजकंटकांनी खुनी हल्ला केला. त्यातून ते थोडक्यात बचावले, पण रक्त सांडले आहे. त्याचवेळी दादरच्या फूल मार्केट या गजबजलेल्या भागात एका तरुणाची गोळ्या घालून हत्या झाली. असे प्रकार गेल्या दोन महिन्यांत वाढीस लागले तरी सर्व काही आलबेल असल्याच्या थाटात कारभार हाकला जात आहे,’ अशी टीका शिवसेनेकडून करण्यात आली आहे.

राज्याचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहमंत्रीपद आहे. मात्र त्यांच्याच नागपूरातील स्थिती वाईट आहे आणि आता तसेच प्रकार मुंबईत घडू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केलं आहे.

# पोलिसाच्या गाडीने ६ जणांना चिरडले
## एकाचा मृत्यू




**अमरावती - नवरात्री महोत्सवात देवीची आरती करून घरी परतणाऱ्या सहा जणांना पोलिसाच्या गाडीने चिरडले. यात एकाचा मृत्यू झाला असून अन्य ५ जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. संतप्त जमावाने पोलीस व्हॅनची तोडफोड केली असून गावात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.**

सध्या नवरात्री महोत्सव सुरू आहे. वेनी गणेशपूर या ठिकाणी देवीची स्थापना करण्यात आली आहे. देवीची आरती करून घरी परतणाऱ्या सहा जणांना पोलिसाच्या गाडीने जोरदार धडक दिली. या धडकेत एकाचा मृत्यू झाला असून अन्य पाच जण जखमी झाले आहेत. रविवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. नवरात्रोत्सव बंदोबस्तासाठी मंगरुळ चव्हाळा पोलिसाची ही गाडी असून गाडी चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला की चालकाने मद्यपान केले होते, याचा तपास पोलीस करीत आहेत. दुर्घटनेची माहिती मिळताच संतप्त गावकऱ्यांनी पोलिसाच्या गाडीची तोडफोड केली. यावेळी गावकऱ्यांनी पोलीस कर्मचारी एकनाथ आगासे (वय ५४) यांना पकडले तर अन्य पोलीस घटनास्थळाहून पळून गेले. अपघातातील जखमींना तात्काळ नांदगावच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले व त्यानंतर अमरावतीला हलवले. यात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# ‘महिलांचा अपमान करणाऱ्या सरकारला शिवाजी महाराजांचे आशिर्वाद कसे लाभणार?’

*राष्ट्रवादी काँग्रेसने महिलांच्या सुरक्षेवरून पुन्हा एकदा राज्यातील फडणवीस सरकारला लक्ष्य केले आहे. आपल्या ‘जवाब दो’ या मोहिमेअंतर्गत राष्ट्रवादीने जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि आमदार राम कदम यांचे नाव न घेता त्यांच्या बेताल वक्तव्यावरून असे मंत्री असणाऱ्या सरकारला छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद यांना कसे लाभणार? असा सवाल उपस्थित केला आहे.*



**भाजपा नेत्यांकडून दारूच्या ब्रँडना महिलांची नावे देण्याची तसेच महिलांच्या अपहरणाची भाषा**

‘५६ इंच छातीवाल्यांसाठी ५६ प्रश्न’ या टॅगलाइन सहित सुरु केलेल्या ‘जबाव दो’ मोहिमेमध्ये आज राष्ट्रवादीने ४१ वा प्रश्न सरकारला विचारला आहे. ‘दारूच्या ब्रँडना महिलांची नावे देण्याची तसेच महिलांच्या अपहरणाची भाषा सत्ताधारी भाजपचे नेते उघडपणे करतात. स्त्रियांच्या सुरक्षितता व सन्मानाला सर्वोच्च महत्त्व देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद यांना कसे लाभणार?’ असे ट्विट राष्ट्रवादीच्या ट्विटवर अकाऊण्टवरून करण्यात आले आहे. मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये नंदुरबार येथील सातपुडा साखर कारखान्याच्या गाळप हंगाम कार्यक्रमात जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दारूच्या ब्रॅण्डला महिलांचे नाव द्यावे असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. राज्यातील दारूच्या खपासाठी दारूच्या ब्रॅण्डला महिलांची नावे द्यावीत, असे महाजन म्हणाले होते. तर दहहिंडीच्या कार्यक्रमामध्ये घाटकोपरचे आमदार राम कदम यांनी मुली पळवून आणण्याचे वादग्रस्त वक्तव्य केले होते. घाटकोपर येथे राम कदम यांनी दहीहंडी उत्सव आयोजित केला होता. त्यावेळी उपस्थित गोविंदांसमोर बोलताना त्यांनी ‘एखादी मुलगी पसंत असेल तर त्या मुलीला पळवून आणण्यात तुम्हाला मदत करेन’ असे वक्तव्य केले होते.

# रिलायन्सच्या वीजग्राहकांवर २ हजार कोटींचा भुर्दंड



**मुंबई** - मुंबई उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने मुंबईला स्वस्तात वीज पुरवठा करण्याचा दावा करत आपल्याच अनिल धीरूभाई अंबानी समूहातील रिलायन्स पॉवरच्या वीजप्रकल्पासह वीज खरेदी करार केला खरा पण खाणीतून कोळसाच न मिळाल्याने महाग कोळसा विकत घेत मुंबईला वीज विकली. काही काळापासून प्रलंबित असलेले हे प्रकरण मुंबई उपनगरातील वीज व्यवसाय अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.ने ताब्यात घेताच या महाग कोळशावर झालेल्या खर्चाची भरपाई रिलायन्सने मागितली आहे. रिलायन्सच्या या लपवाछपवीच्या कारभाराचा फटका मुंबई उपनगरातील वीजग्राहकांना बसणार असून त्यांना सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा भुर्दंड बसण्याची चिन्हे आहेत.

मुंबई उपनगरातील वीज व्यवसाय अनिल धीरूभाई अंबानी समूहातील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या ताब्यात होता. या समूहातील विदर्भ इंडस्ट्रिज पॉवर लि. या नावाखाली नागपुरातील बुटीबोरी येथे ३०० मेगावॅटचे दोन अशारितीने ६०० मेगावॅटचा प्रकल्प टाकण्यात आला. रिलायन्स पॉवर या कंपनीच्या अखत्यारित हा प्रकल्प आता येतो. या प्रकल्पातून मुंबई उपनगरातील वीजग्राहकांना प्रति युनिट २.१० रुपये दराने वीज पुरवण्यात येईल, असा करार करण्यात आला होता. त्यास त्यावेळी राज्य वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली होती.

# नामवंत सुवर्ण व्यवसायिक महादेव घारे यांचे अल्पशा आजाराने निधन

मुंबई मधील सुप्रसिद्ध सुवर्ण व्यवसायिक, महाराष्ट्रीयन लोकांच्या गळयातील ताईत बनलेले एम के घारे ज्वेलर्सचे श्री. उदय घारे यांचे वडील महादेव कृष्णा घारे यांचे दिनांक १२.१०.२०१८ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

मनमिळावू व समाजात नेहमी गरजू व्यक्तींना मदत करणारे मराठी व्यवसायिक अशी त्यांची ख्याती होती. सामाजिक क्षेत्रात स्वत:हून पुढाकार घेऊन गोरगरिबांना मदत करणारे त्याचप्रमाणे त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणारे म्हणून लोकप्रिय होते. विविध सामाजिक क्षेत्रात आर्थिक स्वरुपाची देणगी देण्यात ते अग्रेसर होते. कुणकेश्वर यात्रोत्सव कालावधीत यात्रा नियोजनात देवस्थान समितीस त्यांचे सहकार्य लाभायचे दिनांक १२.१०.२०१८ रोजी कांदीवली येथील तूंगा हॉस्पीटल मध्ये त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. डहाणूकरवाडी स्मशानभूमीत



त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक व व्यापारी क्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होते. पोलिस बातमी पत्र व आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

# #MeToo चा कॉर्पोरेटने घेतला धसका

**मुंबई : #मीटूमुळे बॉलिवूड आणि मीडियामध्ये खळबज माजली असतानाच आता कॉर्पोरेट क्षेत्रानेही या चळवळीची धास्ती घेतली आहे. अशाप्रकारे सोशल मीडियावर कोणी काही सांगण्याआधीच बहुतांशी कॉर्पोरेट कंपन्यांनी लैंगिक अत्याचाराविरोधी कायद्याबद्दल जागृती करणाऱ्या कार्यशाळांचं आयोजन केलं आहे.**



कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये स्त्रीयांवर होणारा लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी २०१३मध्ये पॉश कायदा संमत करण्यात आला. या कायद्या अंतर्गत स्त्रीयांशी गैरवर्तणूक करणाऱ्या कठोर शिक्षेची तरतूद आहे. पण या कायद्याच्या तरतूदी आणि त्याचे बारकावे खूप कमी लोकांना माहित आहेत. यासाठीच महिला कर्मचाऱ्यांची जागृती करण्यासाठी अनेक कंपन्या कार्यशाळा आयोजित करत असतात. काही लिगल कंपन्या,सेवाभावी संस्था या कार्यशाळांमधून महिलांचं प्रबोधन करतात. #मीटू चळवळ सुरू झाल्यापासून अशा कार्यशाळांची मागणी जबरदस्त वाढते आहे. या कार्यशाळा घेणाऱ्या रेनमेकर या कंपनीकडे इतकी मागणी गेल्या काही दिवसांत आली की त्यांची वेबसाइट क्रॅश झाली. कोहेरंट सोल्युशन्स या कंपनीकडे येणारी मागणी २०० टक्क्यांनी वाढली आहे.

# सासू-सासऱ्यांच्या संपत्तीवर सुनेचा काहीही अधिकार नाही

## उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय

**नवी दिल्ली– सासू-सासऱ्यांच्या स्थावर आणि जंगम दोन्ही प्रकारच्या मालमत्तांवर सुनेचा काहीही अधिकार नाही, असा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. एका प्रकरणावर सुनावणी करताना हा निर्णय दिला आहे.जनसत्ताने या संदर्भातील वृत्त दिले आहे.**

***नेमकं प्रकरण काय होतं ?***

एका महिलेने न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. ती सासु-सासऱ्यांकडे देखभाल खर्च मागत नसल्याने तिला त्यांच्या घरात राहू दिलं जावं, अशी मागणी करणारी ती याचिका होती. महिलेने यापूर्वी तिच्या नवऱ्यावर आणि सासु-सासऱ्यांवर हुंड्यासाठी छळत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर महिलेने घटस्फोटासाठीही अर्ज केला होता. महिलेच्या सासऱ्यांनीही जिल्हा न्यायालयासमोर अर्ज करून तिच्यावर मारहाणीचा आरोप केला होता. सासऱ्यांनी केलेल्या आरोपांनंतर जिल्हा न्यायालयाने महिलेला ताबडतोब घरातून बाहेर पडण्यास सांगितलं होतं. त्याविरोधात महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

***न्यायालयाने निकाल देताना नेमकं काय म्हटलं ?***



या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती राजेंद्र मेनन आणि न्यायमूर्ती वी. कामेश्वर राव यांच्या पीठाने महिलेची याचिका फेटाळून लावली. सासू-सासऱ्यांच्या स्थावर किंवा जंगम मालमत्तेवर सुनेचा काहीही अधिकार नाही, असा निर्णय त्यांनी दिला. सासू-सासऱ्यांची मालमत्ता पैतृक असेल किंवा स्वकमाईची, त्याने त्यांच्या मालकी हक्कात काहीही बाधा येत नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मालकीच्या घरात शांततापूर्ण जीवन जगण्याचा संपूर्ण अधिकार असल्याचं नमूद करत त्यांनी कायदेशीर वारसालाही घरातून बाहेर जाण्यास सांगण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

# २४ तास पाणीपुरवठ्याला यंदाच्या पाणीटंचाईचा फटका

**मुंबई :ऑक्टोबर हीटने मुंबईकर घामाघूम होत असतानाच पाणीबाणीने त्यांच्या अडचणीत भर घातली आहे. दक्षिण मुंबईतील पाणीटंचाईने उच्चभ्रू वस्तीतील लोकांचीही झोप उडवली आहे. मात्र २४ तास पाणी मुंबईकरांसाठी यंदाही दिवास्वप्नच ठरणार आहे. अपुरा पाऊस आणि ढिसाळ नियोजनामुळे २४ तास पाणीपुरवठ्याचा मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ११ वर्षानंतरही पूर्ण होण्याची चिन्हे नाहीत.**

सन २००७ मध्ये शिवसेनेने आपल्या वचननाम्यातून २४ तास पाणीपुरवठ्याची घोषणा केली. प्रत्यक्षात या प्रकल्पावर २०१४ मध्ये काम सुरू झाले. मात्र गेल्या



चार वर्षांत महापालिकेने केवळ वांद्रे, खार आणि सांताक्रुझ (एच पश्चिम) तसेच मुलुंड (टी) या दोन विभागांमध्ये २४ तास पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग सुरू केला आहे. ११ वर्षांपूर्वी जाहीर झालेल्या या प्रकल्पाची डेडलाइन २०१९ मध्ये संपत आहे. पुढच्या वर्षीपर्यंत हा प्रकल्प उपनगरामध्ये सुरू करण्याचे लक्ष्य नियोजित केले होते, परंतु या वर्षी अपुऱ्या पावसामुळे जलसाठा कमी असल्याने याचा परिणाम या प्रकल्पावर होत आहे.

***पाण्याची वेळ वाढविण्याबाबत पुनर्विचार करणार!***

मुंबईत गेल्या काही दिवसांमध्ये पाणीटंचाईच्या तक्रारीही वाढल्या आहेत. दक्षिण मुंबईत कफ परेड, फोर्ट, कुलाबा एवढेच नव्हेतर, मंत्रालयासमोरील मंत्र्यांच्या शासकीय बंगल्यांतील पाणीही पळाले होते. त्यामुळे हा प्रकल्पच रद्द करण्याची मागणी संतप्त नगरसेवकांकडून होत आहे. मात्र या वर्षी पाऊस अपेक्षेपेक्षा कमी झाला. त्यामुळे पाण्याच्या वेळेत वाढ करण्याबाबत पुनर्विचार करावा लागेल. तसेच २४ तास पाणीपुरवठा होत असलेल्या विभागांतून अद्याप कोणतीही तक्रार आलेली नाही, असा दावा जल अभियंता खात्यातील एका अधिकाऱ्याने केला आहे.

# गुटखाविक्रेत्यांवर 'आयपीसी'अंतर्गत कारवाई

राज्यात बंदी असलेल्या गुटखा, पानमसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, खर्रा इत्यादींची कोणीही विक्री करीत असेल तर त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखालीही गुन्हा नोंदवून फौजदारी खटला भरला जाऊ शकतो, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच दिला. त्यामुळे राज्य सरकारने काढलेल्या बंदीचा आदेश मोडून कोणीही अशा पदार्थांची विक्री करत असेल तर त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा अन्न व औषध प्रशासनाचा (एफडीए) मार्ग पुन्हा मोकळा झाला आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ४ मार्च, २०१६ रोजी एका प्रकरणात दिलेल्या निकालामुळे 'एफडीए'च्या कठोर कारवाईवर बंधने आली होती. भारतीय दंड संहितेच्या कलम २७२ अन्वये (विक्रीयुक्त पदार्थामध्ये भेसळ करणे), कलम २७३ (अपायकारक व विषारी पदार्थांची विक्री करणे), कलम ३२८ (विषारी पदार्थ देऊन व्यक्तीला इजा पोहोचवणे) व १८८ (सरकारी आदेशाचे उल्लंघन करणे) या कलमांखाली 'एफडीए'कडून आरोपींविरोधात पोलिसांत गुन्हा नोंदवून खटला भरला जात होता. मात्र, त्याला गुटखाविक्रेता चांद पटेलने याचिकेद्वारे औरंगाबाद खंडपीठासमोर आव्हान दिले होते. त्यात ४ मार्च, २०१६ रोजी निकाल देताना 'आयपीसी'खाली करण्यात आलेली कारवाई बेकायदेशीर असल्याचे खंडपीठाने म्हटले होते. तसेच 'एफडीए'ने केवळ अन्न व सुरक्षा मानके कायद्यांतर्गतच कारवाई करावी, असे आदेश दिले होते.

या निर्णयाला राज्य सरकारने अपिलाद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. राज्याच्या अपिलावरील सुनावणीत राज्य सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अॅड. आत्माराम नाडकर्णी व सरकारी वकील अॅड. निशांत कातनेश्वरकर यांनी बाजू मांडली. त्यानंतर अशा प्रकरणांत 'आयपीसी'अंतर्गत फौजदारी कारवाई करता येणार नाही, या औरंगाबाद खंडपीठाच्या मताशी सहमत नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच एका आरोपीविरुद्ध एकाच गुन्ह्यासाठी आयपीसी आणि अन्न व सुरक्षा मानके कायदा या दोन्हींतर्गत खटला चालवला जाऊ शकतो, ते बेकायदा नाही, असा निर्णयही सर्वोच्च न्यायालयाने दिला.

# सरकारच्या गतिमान कारभाराला प्रशासनाची वेसण?

गतिमान कारभार करण्याची सरकारची कितीही इच्छा असली, तरी प्रशासनाचा प्रतिसाद नसेल तर मंत्रिमंडळाचा एखादा महत्त्वाकांक्षी निर्णयदेखील कसा अलगद बासनात जाऊन बसतो, त्याचा मासलेवाईक नमुना सुमारे दीड वर्षांपूर्वीच्या मंत्रिमंडळ बठकीतील एका निर्णयातून उजेडात आला आहे. ग्रामीण भागात कुक्कुटपालनास प्रोत्साहन आणि त्याद्वारे अंगणवाड्यांना अंड्यांचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने दोन वर्षांकरिता 'स्वयम' हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, पण दीड वर्षांत या प्रकल्पाचा एक कागदही इकडून तिकडे हलला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

ग्रामीण भागात परसातील कुक्कुटपालनास प्रोत्साहन, आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्यांना अंड्यांचा पुरवठा आणि त्याद्वारे आदिवासी कुटुंबांना रोजगाराचे साधन मिळवून देणे अशा तिहेरी उद्देशाने राज्यात 'स्वयम' प्रकल्प राबविण्याचा निर्णय १८ एप्रिल २०१७ रोजी मंत्रिमंडळाच्या बठकीत घेण्यात आला. राज्याच्या १६ जिल्ह्यांतील १०४ एकात्मिक बालविकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रांत १०४ खाजगी पक्षीसंगोपन केंद्रे स्थापन करून प्रत्येक केंद्राशी ४१७ लाभार्थीना संलग्न करणे अशी ही योजना होती. यामुळे ४३ हजार ३६८ कुटुंबांना लाभ मिळेल आणि अंगणवाड्यांतील मुलांच्या आहारात अंड्यांचा पुरवठा करून कुपोषणाचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास या प्रकल्पाच्या प्रस्तावात व्यक्त करण्यात आला होता. सुमारे २२ कोटी ५५ लाख रुपये खर्चाचा हा




प्रकल्प केवळ २०१७-१८ आणि २०१८-१९ या दोन वर्षांकरिता राबविण्याचाही निर्णय झाला होता. आदिवासी विकास, महिला व बालविकास, पशुसंवर्धन आणि ग्रामविकास विभाग यांच्यामार्फत हा प्रकल्प राबवण्याचाही निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता.

या निर्णयानंतर २०१७-१८ या आर्थिक वर्षांत काहीच हालचाल झाली नाही. २०१८-१९चे सहा महिनेही संपून गेले. मात्र असा काही प्रकल्प असल्याची जाणीवही संबंधित भागांतील अंगणवाड्यांना झाली नाही. गतिमान कारभारासाठी सरकारने घेतलेल्या या निर्णयास प्रशासनाच्या उदासीनतेची वेसण बसली. कागदी घोडे तर एक पाऊलही पुढे सरकले नाहीत. मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन मंजूर केलेला हा प्रकल्प व्यवहार्य नसल्याचा साक्षात्कार नंतर प्रशासनास झाला. त्यामुळे, प्रस्ताव तयार करताना याचा अभ्यास केला गेला की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी गेल्याच आठवड्यात एक बठक झाली. लवकरच अंमलबजावणीसाठी पुढील पावले टाकण्यात येणार असल्याचे सरकारी छापाचे उत्तर मंत्रालयातील सरकारी बाबू देत आहेत. दोन वर्षांसाठी आखलेल्या या प्रकल्पाच्या कालावधीपकी १८ महिने काहीच न होता संपल्यावर उरलेल्या पाच-सहा महिन्यांत हा प्रकल्प कार्यान्वित कसा होणार, त्यामुळे लाभार्थीच्या पदरात काय पडणार, कोंबड्यांची पिल्ले खरेदी करून ती मोठी होऊन अंडी कधी देणार आणि आदिवासी अंगणवाड्यांतील मुलांचे कुपोषण कधी कमी होणार, असे सारे प्रश्न अधांतरी आहेत.

# मुंबईकरांना आणखी घाम फुटणार; ऑक्टोबर हिट वाढणार

**मुंबई : ऑक्टोबर हिटचा तडाखा वाढतच असून, सांताक्रूझ आणि कुलाबा या दोन्ही वेधशाळांमध्ये शनिवारी कमाल तापमानाची नोंद ३७ अंश झाली आहे. वाढते तापमान, वाहते उष्ण वारे आणि उकाडा मुंबईकरांचा घाम काढत असून, उत्तरोत्तर यात वाढच नोंदवण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात मुंबईकरांना आणखी घाम फुटणार आहे.**



भारतीय हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील २४ तासांत गोव्यासह संपूर्ण राज्यात हवामान कोरडे होते. मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्राच्या काही भागात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. मराठवाडा, विदर्भाच्या काही भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्राच्या काही भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे.

# वसई-दिवादरम्यान 'मेमू'



**मुंबई:** मध्य रेल्वेवरील दिवा-वसई या बोईसर पट्ट्यात मोडणाऱ्या मार्गावर आतापर्यंत सुरू असलेला डिझेलवरील इंजिनांचा वापर सोमवार, १५ ऑक्टोबरपासून बंद होणार आहे. त्याऐवजी मध्य रेल्वेने विजेवर चालणाऱ्या मेमू गाड्या सेवेत आणल्या आहेत. या सेवांमुळे डिझेलची बचत होतानाच हरित उर्जेचा उद्देश साध्य करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. सोमवारपासून डेमूऐवजी मेमू गाड्या प्रवाशांच्या सेवेत येणार आहेत.

रेल्वे मार्गावरील विद्युतीकरणामुळे इंधनबचत होतानाच पर्यावरणाची हानीही टाळली जाते. त्याचाच भाग म्हणून मध्य रेल्वेवरील दिवा ते वसई पट्ट्यात आता विजेवर चालणाऱ्या मेमू लोकल चालवल्या जणार आहेत. या गाड्यांना १२ डबे असून प्रवासी क्षमताही तेवढीच राहणार आहे. लोकल मार्गावर चालणाऱ्या लोकलपेक्षा मेमू लोकल काही प्रमाणात वेगळ्या असतात. मध्य रेल्वेने नुकतेच पेणपर्यंत विद्युतीकरण पूर्ण केल्याने तिथपर्यंतही मेमू गाड्या चालवणे शक्य होणार आहे. डिझेलच्या किंमती वाढत असतानाच विजेवरील गाड्यांचा पर्याय उपलब्ध झाल्याने इंधनावरील खर्चही कमी हेण्यास मदत होणार आहे.

# बेस्ट संपवण्याचा पद्धतशीर डाव!

बेस्टचा तोटा कमी करण्यासाठी तिकीट दरवाढीप्रमाणेच ताफ्यातील ९०० बसची संख्या कमी करणे असे अनेक निर्णय उपक्रमावर विपरित परिणाम करणारे आहेत. ई-तिकीट मशिन्सच्या तुटवड्यामुळे बेस्टमध्ये मासिक पास देणे बंद झाले असून, विद्युत आणि परिवहन उपक्रम स्वतंत्र करण्याचाही प्रस्ताव आहे. अशा वेगवेगळ्या धोरणांमुळे बेस्टची सेवा क्रमाक्रमाने ढासळवण्याचे प्रयत्न नियोजन पद्धतीने सुरू असून, त्यातून सार्वजनिक वाहतूक सेवा संपुष्टात येईल, अशी भीती 'आमची मुंबई, आमची बेस्ट' नागरिक मंचाने व्यक्त केली आहे.


बेस्ट उपक्रमाने सादर केलेल्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर नागरिक मंचाने बेस्टच्या अस्तित्त्व टिकवण्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. बेस्ट उपक्रमाचा तोटा अर्थसंकल्पात ७२० कोटी रुपये अपेक्षित असून, एकूणच उपक्रम टिकण्याऐवजी त्याचा स्तर घसरत चालला असल्याबद्दल 'आमची मुंबई, आमची बेस्ट'तर्फे चिंता व्यक्त केली आहे. या नागरिक मंचाने काही मुद्द्यांच्या अनुषंगाने त्याचे विश्लेषण केले आहे. एका ठराविक टप्प्यानंतर बेस्ट सेवेचे हे आकुंचन सेवेस मारक ठरेल, असा इशाराही दिला आहे. चांगल्या बससेवेविना मुंबई ही प्रदूषण, वाहतूककोंडी, अकल्याणकारी सार्वजनिक व्यवस्थेचे बळी ठरेल. त्यामुळे, मुंबई महापालिका आणि बेस्ट प्रशासनाने बेस्ट सेवा पूर्वीप्रमाणेच सक्षम करण्यासाठी पावले उचलण्याची मागणी केली आहे.

'आमची मुंबई, आमची बेस्ट'तर्फे बेस्टसाठी जनतेचा आराखडा सादर करण्यात आला होता. त्या सूचनांकडे दुर्लक्ष करून



उलट स्तरावर प्रवास सुरू असल्याची भूमिका मंचातर्फे मांडण्यात आली आहे. बेस्टने मासिक पास देणे बंद केले असून त्यास ई-तिकीट मशिन्सचा तुटवडा कारणीभूत आहे. या तुटवड्यामुळे स्मार्ट कार्ड पुरवता येत नाही. त्यासाठी बेस्ट प्रशासनाप्रमाणेच समिती जबाबदार असल्याचाही दावा मंचाने केला आहे. बेस्टने अनेक आगारांच्या पुनर्विकासाचे हक्क विकासकांना दिले आहेत. पण त्यांच्याकडून सुमारे ३५० कोटी रुपये एका वर्षात वसूल केले नसल्याचा मुद्दाही उपस्थित केला आहे.

# लाचखोरीला आवर घालावालाच... देणे, घेणे हा गुन्हा



लाच देणे, घेणे हा गुन्हा असून त्याप्रमाणे कारवाई केली जाते. पण, कामे होण्यासाठी नागरिकांकडून लाच देण्यासाठी पुढाकार घेतला जातो. त्याचा अहवाल धक्कादायक आहे. केवळ लाच घेणारे नव्हे तर त्यासाठी उद्युक्त करणारे महाभागही असतात. ही पद्धत लाचखोरीस प्रोत्साहन देणारी आहे. लोकल सर्कल्स संस्थेने ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल इंडियाच्या सहाय्याने केलेल्या सर्वेक्षणात राज्यातील ४७ टक्के जणांनी लाच दिल्याचे उघड झाले आहे.

# राम कदमांचा नवा प्रताप

## मतदार यादीत नाव नोंदवा हमर, बेन्टलीमधून फिरवून आणतो



दहीहंडी उत्सवात मुली पळवून आणण्याचे वादग्रस्त वक्तव्य करणारे घाटकोपर येथील भाजपा आमदार राम कदम पुन्हा एकदा नव्या वादात सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांनी वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या नव मतदारांना मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी लालूच दाखवली आहे. २००९ साली मी पहिल्यांदा आमदार झालो. त्यावेळी जी मुले चौथी-पाचवीत होती. ती आता १८ वर्षांची झाली आहेत. त्या सर्वांनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी. तुम्ही मतदार यादीत नाव नोंदवल्यास तुम्हाला हमर, बेन्टली या महागडया गाडयांमधून फिरवून आणीन. शाहरुख खान, सलमान खान, वरुण धवन, रणवीर सिंह या अभिनेत्यांबरोबर तुमची भेट घडवून आणीन तसेच तुम्हाला तिरुपती बालाजी यात्रेला घेऊन जाईन अशी आमिष राम कदम यांनी दाखवली आहेत.

# मुंबईत पत्रकार हरमन गोम्सवर जीवघेणा हल्ला



**मुंबई** - 'टाइम्स नाउ'चे पत्रकार हरमन गोम्स आणि त्यांच्या एका मित्रावर काल मध्यरात्री अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गोम्स व त्यांचा मित्र गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी अज्ञांत हल्लेखोरांविरुद्ध गांवदेवी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची दखल घेतली आहे.

हरमन गोम्सची वाट पाहणाऱ्या हल्लेखोरांनी रात्री दीडच्या सुमारास हल्ला केला. हल्लेखोर हे माझ्या घराबाहेर आमची वाट पाहत उभे होते, हल्ला केल्यानंतर हल्लेखोरांनी माझ्या मित्राचा फोन सुद्धा हिसकावून नेला, असे हरमन गोम्स यांनी सांगितले. या हल्ल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. टाइम्स नाउवर आलेल्या एखाद्या बातमीने दुखावलेल्या व्यक्तीकडून हा हल्ला केला असण्याची शक्यता आहे. माझ्या कोणत्या स्टोरीमुळे माझ्यावर हा हल्ला झाला माहिती नाही पण आतापर्यंत पूर्णखात्री करूनच स्टोरीज दिल्याचे हरमन यांनी स्पष्ट केले आहे. माझ्या डोळयाला गंभीर दुखापत झाली असून डोळ्याजवळ सहा टाके पडले आहेत. या हल्ल्यामुळे माझे कुटुंब खूप धास्तावले आहे, असे हरमन गोम्स यांनी फेसबुकवर टाकलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

एकूण चार हल्लेखोर होते. ते हल्ला करण्यासाठी आधीपासूनच माझ्या घराबाहेर उभे होते. माझ्यावर हल्ला केल्यानंतर त्यांनी माझ्या मित्रावरही हल्ला केला तसेच त्याचा मोबाईल हिसकावून नेला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

# आता दारुही मिळणार घरपोच?

## राज्य सरकार सकारात्मक

मद्यपींसाठी महाराष्ट्र सरकार एक नवीन धोरण लागू करण्याची शक्यता आहे. दारु हवी असणाऱ्यांना घरपोच दारु पोहोचवण्याच्या योजनेवर राज्य सरकार विचार करत आहे. दारु उद्योगासाठी ही योजना 'गेम चेंजर' ठरेल, असा विश्वास उत्पादनशूल्क



मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलून दाखवला आहे. जर ही योजना लागू झाली तर असे करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरेल. 'ड्रिंक अँड ड्रायव्ह' आणि रस्ते अपघात रोखणे हा या योजनेमागचा राज्य सरकारचा उद्देश आहे.

दारु पिऊन वाहन चालवताना होणाऱ्या अपघाताच्या घटना वारंवार पाहायला मिळतात. यामध्ये अनेकांचा नाहक जीव जातो. हे रोखण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. बावनकुळे पुढे म्हणाले, ज्या पद्धतीने इ-कॉमर्स वेबसाइट इतर वस्तू घरपोच करतात. त्याच माध्यमातून दारुही घरपोच पुरवण्यात येईल. यामुळे 'ड्रिंक अँड ड्राइव्ह'सारख्या घटनांचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

दारुची ऑर्डर घेताना ग्राहकांची संपूर्ण माहिती घेणे. यामध्ये आधार क्रमांक असणे सक्तीचे असेल. आधारमुळे संबंधित व्यक्तीची ओळख पटेल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. या दारुच्या बॉटलवर जियो टॅगिंग असेल. त्यामुळे ते ट्रॅक होईल. म्हणजे उत्पादकापासून ते ग्राहकाच्या घरापर्यंतचा दारुचा प्रवास समजेल. यामुळे तस्करी आणि चुकीच्या दारु विक्रीवर प्रतिबंध लागू शकेल, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ४.६४ लाख रस्ते अपघातातील घटनांमध्ये १.५ टक्के अपघात हे दारु पिऊन वाहन चालवताना झाल्याचे नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोने (एनसीआरबी) नोंदवले आहे.

# दादरचा प्लॅटफॉर्म जीवघेणा

**मुंबई** - मध्य रेल्वेवरील दादर स्थानकातील एक आणि दोन क्रमांकाचे प्लॅटफॉर्म धोकादायक स्वरूपाचे असून, या प्लॅटफॉर्मवर तुफान गर्दी उसळत असतानाच ठाणाच्या दिशेकडील प्लॅटफॉर्म अरुंद असल्याने प्रवाशांचे जीव धोक्यात आले आहेत. पादचारी पुलाजवळ काही अंतरावरच प्लॅटफॉर्म संपत असल्याने अपघाताची टांगती तलवार कायम आहे. प्लॅटफॉर्म रुंद करण्यासह तिथे समांतर प्लॅटफॉर्म उपलब्ध केले तरच अपघातांचे संकट टळेल, असे सांगण्यात येते.

दादरमधील एक आणि दोन क्रमांकांच्या प्लॅटफॉर्मवरील टोकाकडील भागात चालत्या लोकलमधून उतरताना वा शिरण्याच्या प्रयत्नात तोल जाऊन अपघात होतात. शुक्रवारीही एक प्रवासी या भागातील पोकळीत पडून जखमी झाला होता. त्यापूर्वी सुदर्शन चौधरी नावाचा इंजिनीअर तरुण चालती लोकल पकडताना याच भागात पडून मृत झाला होता.

# पोलिसांवरील अतिरिक्त कामांचा भार कमी करा!

**पोलिसांवर त्यांच्या निर्धारित कामांशिवाय अनेक अनुत्पादक कामांचा अतिरिक्त भार टाकण्यात आला आहे. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची उकल करणे आणि देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करणे या मूळ जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी तसेच त्यासाठी लागणाऱ्या क्षमता विकसित करण्यासाठी पोलिसांना वेळच मिळत नाही. यास्तव पोलिसांना अतिरिक्त कामांतून मुक्त करून मुख्य जबाबदारीवर लक्ष केंद्रित करण्यास वेळ दिला पाहिजे, असा सूर अंतर्गत सुरक्षेसंबंधी पुस्तकावरील चर्चेतून उमटला.**

भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) माजी अधिकारी वप्पाला बालचंद्रन यांनी लिहिलेल्या 'किपिंग इंडिया सेफ : द डिलेमा ऑफ इंटर्नल सिक्युरिटी' या पुस्तकावर शनिवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्यात लेखकवप्पाला बालचंद्रन,भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) माजी अधिकारी राम प्रधान, ज्येष्ठ पत्रकार आणि खासदार कुमार केतकर, माजी आयएएस अधिकारी बाळ भागवत, निवृत्त आयपीएस अधिकारी सतीश साहनी, निवृत्त आयपीएस अधिकारी एम. एन. सिंग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षणशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. श्रीकांत परांजपे, मुंबईतील



एशियाटिक सोसायटीचे उपाध्यक्ष योगेश कामदार आदी मान्यवरांनी भाग घेतला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस एस. जी. काळे यांनी चर्चेचे संचालन केले.

लेखक बालचंद्रन यांनी पुस्तकातील मुद्द्यांचा आढावा घेतला. भारतीय राज्यघटनेतील काही त्रुटींमुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हाने हाताळताना अडचणी येत असल्याचे बालचंद्रन यांनी सांगितले. राज्यघटनेत अंतर्गत सुरक्षा या विषयाचा समावेश करताना घटनेच्या रचनाकारांनी १९३५ सालच्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट या ब्रिटिशकालीन कायद्याचा आधार घेऊन चूक केली. त्यानुसार कायदा आणि सुव्यवस्था ही राज्यांची जबाबदारी ठरवण्यात आली आणि आपत्कालीन स्थितीत केंद्र सरकार राज्यांना मदत करील अशी तरतूद करण्यात आली. यामुळे हिंसक चळवळींच्या काळात देशाची अंतर्गत सुरक्षा हाताळण्यास राज्ये पुरेशी सक्षम बनली नाहीत आणि त्यात केंद्राची भूमिका कमकुवत झाली. अंतर्गत सुरक्षेच्या प्रश्नावर केंद्र सरकार कमजोर बनणे ही चूक होती. ती घटना तयार करताना टाळता आली असती. अर्थात सरकारला याची जाणीव नव्हती असे नाही. पण राज्यांकडून होणाऱ्या विरोधाचा विचार करून तसे करणे टाळले जाते, असे ते म्हणाले.

विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव याकडेही त्यांनी लक्ष वेधले. मुंबईतील २६ नोव्हेंबर २००८ रोजीच्या दहशतवादी हल्ल्याची आगाऊ सूचना देण्यास केंद्र सरकार कमी पडले आणि राज्य पोलिसांनी उपलब्ध साधनांनीशी दहशतवाद्यांचा मुकाबला केला, असे बालचंद्रन यांनी पुस्तकात नमूद केले आहे.

देशात सध्या मुस्लिमांवर दहशतवादाचा शिक्का मारून सामाजिक तेढ निर्माण केली जात आहे. हे पंजाबमधील शीख आंदोलनाच्या वेळीही झाले नव्हते. मात्र आता राजकीय पक्ष तशी तेढ निर्माण करत आहेत आणि काही प्रसारमाध्यमे त्याला खतपाणी घालत आहेत. ही स्थिती सुरक्षेसाठी घातक आहे, याकडे कुमार केतकर यांनी लक्ष वेधले. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आपला कायदा कसा उत्क्रांत होत गेला, याचा उल्लेख पुस्तकात नाही याकडे राम प्रधान यांनी लक्ष वेधले. तसेच पोलीस आणि प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना अधिकारांचा योग्य वापर करता आला पाहिजे, असेही ते

## संपादकीय...



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# '#Me Too'चे नवे वादळ

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सोशल मिडियावरून व्हायरल झालेली लैंगिक शोषणाच्या विरोधातील मोहीम प्रामुख्याने परदेशी आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होती. त्यातूनच हार्वे विन्स्टीन या हॉलिवूडमधील बड्या निर्मात्याच्या भोवती गंभीर आरोपांचे जाळे विणले गेले. बिल कॉस्बीसारखा नामवंत कलाकार गजाआड झाला. आपल्याकडे हे सारे केवळ हॉलिवूडशी निगडीत असल्याचा समज करून घेऊन पाहिले गेले. खरेतर महिलांवर होत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधातील आवाज ही या 'मी टू' मोहिमेची ओळख होती. त्या आंतरराष्ट्रीय प्रकरणात आपल्याकडील प्रियांका चोप्रा आदी मोजक्याच लोकांनी मते व्यक्त केली आणि काही महिन्यांच्या आत हा आवाज क्षीण बनला. अर्थात भारतात मोठ्या प्रमाणात घडणाऱ्या बलात्काराच्या विरोधात उठवलेला आवाज, कार्यालयीन परिसरात शालीनतेला भंग करणाऱ्या कृत्यांना आळा घालण्यासाठी उचललेल्या पावलांना या मोहिमेशी जोडता आले तर ते योग्य ठरेल. महिलांवर होत असलेल्या लैंगिक अन्यायाला वाचा फोडणारी 'मी टू' मोहीम बारा वर्षापासून सुरू आहे.



परंतु ती व्हायरल झाली ती ट्वीटर या माध्यमामुळे. त्यानुसार, भारतात एका मुलाखतीवरून या आवाजाला नवे बळ मिळाले असे दिसते. आता देशभरात या मोहिमेने चांगलेच मूळ धरले असून अवघ्या काही दिवसांतच त्याचे व्यापक रूप दिसले. गतकालीन तारका तनुश्री दत्त हिने परदेशाहून परतल्यानंतर एका मनोरंजन वाहिनीला मुलाखत देताना दहा वर्षापूर्वी 'हॉर्न ओके प्लीज' या चित्रपटाच्या गाण्याच्या चित्रिकरणाच्या वेळी अभिनेता नाना पाटेकर यांनी आपल्याशी गैरवर्तन केल्याची तक्रार नोंदवली होती, त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे सांगितले. तेथपासून सुरू झालेली ही क्ष्मीटू मोहीम पुन्हा चित्रपट क्षेत्रापुरती मर्यादित आहे, असे वाटत असताना गेल्या तीन चार दिवसांत त्याने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. त्यात चित्रपट क्षेत्रातील काही दिग्गज नावांबरोबरच पत्रकारिता क्षेत्रातीलही मोठी नावे उघड व्हायला सुरुवात झाली. त्याचे पडसाद अन्य क्षेत्रातही दिसतील, याबद्दल शंका वाटत नाही. आरोप झालेल्या काही अभिनेते, दिग्दर्शक, लेखक यांनी एकतर हे आरोप नाकारलेले आहेत, किंवा त्याबद्दल क्षमा मागून त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. काही ज्येष्ठ पत्रकारांनी पदावरून बाजूला होण्याचा निर्णय घेतला असून काही मोठ्या पदावरील व्यक्तींनी अद्याप आपली बाजू मांडलेली नाही किंवा प्रतिक्रियाही दिलेली नाही. काही ठिकाणी पीडितांनी स्वत:ची ओळख उघड करण्याचे धाडस दाखवले आहे. त्याचप्रमाणे काही पीडितांनी अत्याचार करणाऱ्यांची नावे घेतली आहेत तर काही ठिकाणी सूचकपणे अंगुलीनिर्देश केले आहेत. यातील काही प्रकरणे अनेक वर्षापूर्वीची आहेत, हे खरे आहे. पण म्हणून त्यांनी झालेले अत्याचार, त्यांना सहन करावे लागलेले त्रास आणि मनाला तसेच शरीराला झालेल्या जखमा विसरून जावे असे अजिबात नाही. उलट निरोगी, सुदृढ समाजाच्या घडवणुकीसाठी कोणतीही गोष्ट, मग ती कितीही विकृत किंवा लज्जास्पद का असेना, लपवून ठेवणे अधिक घातक असते. त्यादृष्टीने आपला समाज खास करून लिंगभेदाच्या बाबतीत आणि स्त्रिया व लैंगिक अल्पसंख्यांकाच्या संदर्भात मोठ्या घुसळणीतून जात आहे. तो अधिक शहाणा आणि सशक्त होत आहे. मुस्लीम महिलांच्या तलाकविषयक धोरण असो की समलैंगिकता आणि स्त्रीपुरुष संबंधात असलेले गुन्हेगारीचे अंग बाजूला करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, आपण समाजातील नेहमी दृष्टीआड करू पाहणाऱ्या गोष्टींना सामोरे जाण्यास अधिकाधिक सक्षम होत आहोत याचेच ते द्योतक आहे. या 'क्ष्मीटू'च्या मोहिमेकडे तसेच पाहायला हवे. यात ज्यांना आतापर्यंत आपल्यावरील अत्याचाराच्या दु:खात कुढत राहावे लागले, त्यांना मोकळेपणे व्यक्त होता यावे. अत्याचार करणाऱ्यांना योग्य शिक्षा व्हायला हवी. त्यासाठी या मोहिमेला थिल्लर स्वरूप प्राप्त होऊ नये आणि याकडे जुने हिशोब चुकते करण्याची संधी म्हणून पाहिले जाता कामा नये. तसे करणाऱ्यांनाही दंड व्हायला हवा. कारण सन्मान केवळ स्त्रीचा किंवा पुरुषांचा असतो असा नाही. तो सगळ्यांचाच असायला हवा. तथापि, याला स्त्री विरुद्ध पुरुष असे स्वरूप प्राप्त होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. आरोपामुळे स्त्री असो वा पुरुष, दोघांचीही तसेच त्यांच्या कुटुंबियांचीही आयुष्ये उद्ध्वस्त होतात. अखेर स्त्री आणि पुरुष यांचे मैत्रीपूर्ण सौख्य आणि एकत्रित कार्यामुळे समाज बळकट होणार आहे. त्याला बाधा येऊ न देण्याची काळजी घ्यायला हवी.

# शेतकऱ्यांमधील वाढती नाराजी मोदी सरकारला भोवणार?




**लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना शेतकरी वर्गात वाढत असलेली नाराजी नरेंद्र मोदी सरकारसाठी चिंतेचा विषय बनू लागली आहे. स्व. इंदिरा गांधी आणि स्व. अटलबिहारी वाजपेयींसारख्या अत्यंत लोकप्रिय आणि शक्तिशाली पंतप्रधानांनाही शेतकऱ्यांच्या नाराजीपायी पायउतार व्हावे लागले होते. बहुधा तो इतिहास ज्ञात असल्यानेच भारत किसान युनियनने काढलेल्या किसान क्रांती यात्रेचा विषय मोदी सरकारने चिघळू दिला नाही. दिल्लीच्या सीमेवर बळाचा वापर करून भले यात्रा अडविण्यात आली; पण रात्री यात्रेस दिल्लीत प्रवेश देण्यात आला आणि पहाटेपर्यंत यात्रेच्या नेत्यांशी चर्चा करून, आश्वासने देऊन आंदोलनाची अखेर करण्यात सरकारला यश आले. शेतकऱ्यांचे आंदोलन चिघळू न देण्यात सरकारने राजकीय चातुर्य दाखवले खरे; पण कृषी क्षेत्राची एकूणच बिकट परिस्थिती लक्षात घेता, हे चातुर्य किती दिवस कामी येईल, हे सांगता येत नाही.**

जनगणनेच्या आकडेवारीचे विश्लेषण हे दर्शविते, की दररोज दोन हजारांपेक्षाही जास्त शेतकरीशेतीला रामराम ठोकत आहेत. जनगणना २०११ मध्ये झाली होती. त्यानंतरच्या सात वर्षात परिस्थिती अधिक वाईट झाली असण्याचीच शक्यता आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत कृषी क्षेत्राचा सरासरी विकास दर चार टक्के एवढा होता. गत चार वर्षात त्यामध्ये घसरण झाली आहे. संपुआ सरकारच्या अखेरच्या वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजेच जीडीपीमधील कृषी क्षेत्राचा वाटा १८.३० टक्के एवढा होता. विद्यमान सरकारच्या कारकिर्दीत त्यामध्येही घट झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही वाढ झाली आहे. हे सगळे चित्र भेसूर आहे. मोदी सरकार मात्र सत्तेवर आल्यापासूनच, २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन देत आहे. आठ वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे होते, तर चार वर्षात ते किमान घसरायला तर नको होते! आकडेवारीचे निकष मात्र उत्पन्न घटले असण्याकडेच अंगुलीनिर्देश करीत आहेत.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर कृषीमालास जास्त दर मिळायला हवे, हे साधे तर्कशास्त्र आहे. प्रत्यक्षात होते काय, तर जेव्हा एखाद्या विशिष्ट कृषीमालाचे उत्पादन कमी होऊन बाजारात दर चांगले मिळतात, तेव्हा त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याऐवजी दलाल मलिदा ओरपतात आणि जेव्हा उत्पादन जास्त झाल्यामुळे दर कोसळतात तेव्हा शेतकऱ्यांचे मरण होते! कृषीमालास उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के एवढा किमान आधारभूत दर देण्याचे आश्वासन मोदी सरकारने दिले होते. ते पूर्ण केल्याचा दावा सरकार करीत आहे; मात्र प्रत्यक्षात उत्पादन खर्च निश्चित करण्यात हातचलाखी करण्यात आल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे केवळ किमान आधारभूत दर जाहीर केल्याने शेतकऱ्याचे भले होत नाही. तो दर शेतकऱ्याच्या पदरात पडणे गरजेचे असते. प्रत्यक्षात तसे होत नाही. एक तर सरकारी संस्था सर्व प्रकारच्या शेतमालाची खरेदी करीत नाहीत. ज्या वाणांची खरेदी करतात त्या वाणांसाठी खरेदी केंद्रे कधीच वेळेत सुरू होत नाहीत. ती सुरू होईपर्यंत पैशाची चणचण भासत असलेला शेतकरी मिळेल त्या दराने माल विकून मोकळा होतो. मग व्यापारी शेतकऱ्याकडून स्वस्तात विकत घेतलेला माल सरकारी खरेदी केंद्रांमध्ये जादा दराने विकून नफा कमावतात! वर्षानुवर्षांपासून सुरू असलेला हा खेळ मोदी सरकारच्या कारकिर्दीत बंद होईल, अशी खुळी आशा शेतकरी वर्गाने बाळगली होती; मात्र ती पुरती फोल ठरल्याचे एव्हाना सुस्पष्ट झाले आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याच्या उद्देशाने मोदी सरकारनेच २०१६ मध्ये नेमलेल्या दलवाई समितीने कृषी क्षेत्रात ६.४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची शिफारस केली होती. प्रत्यक्षात मोदी सरकारने चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात आधीच्या वर्षीच्या तुलनेत कृषी क्षेत्रासाठी अवघी ४ हजार ८४५ कोटी रुपयांची वाढ केली! शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या आपल्याच आश्वासनासंदर्भात सरकार किती गंभीर आहे, हे या आकडेवारीवरून स्पष्ट व्हावे. सर्वसामान्य शेतकऱ्याला जीडीपी, त्यामधील कृषी क्षेत्राचा वाटा इत्यादी आकडेवारी कळत नाही हे खरे असले तरी, आपल्या खिशात चार पैसे जास्त आले की कमी आले, हे त्याला बरोबर कळते. जेव्हा खिशात पैसे कमी आल्याचे लक्षात येते तेव्हाच तो रस्त्यावर उतरतो. रस्त्यावर उतरूनही मागण्या मान्य होत नाहीत, असे दिसते तेव्हा तो प्रक्षुब्ध होतो आणि जेव्हा तो प्रक्षुब्ध होतो तेव्हा सत्ताधारी पक्षाला निवडणुकीत त्याची किंमत मोजावी लागते, हा इतिहास आहे. विद्यमान सत्ताधारी पक्षाचे कर्तेधर्ते परिस्थितीच्या विश्लेषणामध्ये तज्ज्ञ आहेत. त्यांना शेतकरी वर्गात वाढू लागलेल्या नाराजीची जाणीव झाली असेलच! तिची दखल घेऊन काही निर्णायक पावले उचलली तरच त्यांना आणखी पाच वर्षांसाठी सत्ता मिळण्याची अपेक्षा करता येईल.

# ठाणे वाहतुक पोलिसांचा बेवारस वाहनांवरील कारवाईला वेग



**ठाणे** - रस्ते वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या आणि संपूर्ण मार्गिका अडवून वर्षानुवर्षे बेवारस अवस्थेत असलेल्या वाहनांवर ठाणे वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. आतापर्यंत ३४६ वाहने भंगारात काढण्यात आली. पोलिस आयुक्तालयातील वाहतूक पोलिस विभागाकडून टप्प्याटप्प्याने ही कारवाई केली जात असून ठिकठिकाणी महापालिकांकडून देण्यात आलेल्या भूखंडावर या गाड्या उभ्या करण्यात येत आहे. या वाहनांवर दावा सांगणाऱ्यांनी ठराविक मुदतीमध्ये वाहने ताब्यात न घेतल्यास त्यांची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीनेही वाहतूक पोलिसांनी कार्यवाही सुरू केली. यामुळे रस्ते वाहतुकीला होणारा अडथळा दूर होणार असून वाहतूककोंडीच्या समस्येतून सुटका होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त होत आहे.

ठाणे शहरातील विविध रस्त्यांवर नो पार्किंगमध्ये अनेक वाहने कित्येक वर्षांपासून उभी असून अशी भंगार वाहने वाहतुकीला अडथळा ठरू लागली आहेत. ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडीमध्येही अशा वाहनांचा उपद्रव आहे. या वाहनांमध्ये अनेक दुष्कृत्य होत असल्याच्याही तक्रारी पोलिसांकडे येत होत्या. या वाहनांच्या मार्गिकेचा फायदा इतरही अनधिकृत पार्किंगसाठी होऊ लागला होता. म्हणूनच या समस्या दूर करण्यासाठी ठाणे वाहतूक पोलिस आणि स्थानिक महापालिका यांच्यातर्फे ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. वाहतूक पोलिस अशा बेवारस वाहनांवर स्टिकर्स चिकटवत आहेत. वाहने २४ तासांमध्ये हटवण्याच्या सूचना याद्वारे केल्या जात आहेत. तरीही कार्यवाही न झाल्यास दुसऱ्या दिवशी ही वाहने उचलून थेट डम्पिंग ग्राऊंडवर नेली जात आहेत. ज्यांच्या मालकीची ही वाहने आहेत, त्यांनी ती डम्पिंग यार्डातून घेऊन जावीत, अन्यथा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे पोलिसांनी सांगितले. सोमवारी कळवा परिसरातील ५ ते ७ वाहनांवर अशी कारवाई करण्यात आल्याची माहिती वाहतूक पोलिस निरीक्षक मनोहर आव्हाड यांनी दिली. रस्त्याच्या आसपासच्या बेवारस पार्किंग वाहनांमुळे वाहतूककोंडी होत असल्यामुळे दोन महिन्यांपासून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. आतापर्यंत ३४६ वाहने डम्पिंग ग्राऊंडवर नेण्यात आली. शिळफाटा येथील डम्पिंग ग्राऊंड, कापूरबावडी आणि साकेत परिसरातील उपलब्ध क्षेत्रात ही वाहने पाठवली जात आहेत. ही मोहीम कायमस्वरूपी सुरू राहणार असून शहरातील धूळधाण झालेल्या वाहनांना थेट डम्पिंग ग्राऊंडची वाट दाखवण्यात येणार आहे.

# नवी मुंबईतील विकासकामांना गती

**नवी मुंबई** - नवी मुंबई महापालिकेच्यावतीने नागरिकांसाठी आवश्यक कामांची पूर्तता करण्यात येत असून विविध विभागांतील नागरी सुविधा कामांना मंजुरी मिळाली आहे. ही कामे सुरू होत असून याद्वारे नागरिकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत.

सीबीडी बेलापूर येथे शीव-पनवेल महामार्गावर कोकण भवन इमारतीनजीक असलेल्या मोठ्या आकाराच्या सर्कलमुळे त्या ठिकाणी नेहमीच वाहतूककोंडी होत असते. त्यामुळे वाहतूक विभागाकडूनही यावर उपाय करण्याविषयी सूचित करण्यात येत होते. त्यानुसार प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यात येऊन सर्कल काढून टाकून त्याठिकाणी डांबरी रस्ता तयार करण्यात येत आहे. त्यामुळे तेथील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे चिंचपाडा, ऐरोली येथील हनुमान मंदिर ते जय भवानी मंदिरापर्यंतच्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. हा रस्ता काहीसा खोल असल्याने त्याची उंची वाढविणेही गरजेचे होते. त्या अनुषंगाने या रस्ता सुधारणेचे काम हाती घेण्यात येत आहे. याशिवाय सेक्टर २०, बेलापूर येथे राम मारुती मंदिरासमोरील मोकळ्या जागेवर खासदार राजन विचारे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१७-१८ खासदार निधीमधून नवीन सभामंडप बांधण्याचे काम सुरू होत आहे. घणसोली येथील नवी मुंबई महापालिकेच्या शाळा क्रमांक ४२च्या चार मजली इमारतीची रंगरंगोटी करण्यात येत आहे. ऐरोली नाका येथे असलेल्या गणपती तलाव याठिकाणी विसर्जन घाट बांधण्यात येणार आहे. ऐरोली सेक्टर ८ ए येथील भूखंड क्रमांक २३जवळील रस्ता एका बाजूने मुख्य रस्त्याला जोडलेला असल्याने त्या ठिकाणी गटार बांधण्याचे काम सुरू करण्यात येत असून त्याद्वारे या रस्त्याची रुंदी वाढणार आहे.

# अंबरनाथमध्ये नशेच्या औषधांचा साठा जप्त

**अंबरनाथ** - अंबरनाथ शहरातील शाळकरी मुले, कॉलेज तरुणांना नशेच्या जाळ्यात ओढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नशेच्या औषधांचा साठा अंबरनाथ पोलिसांनी कैलास नगर भागातून जप्त केला आहे. मुंब्रा येथील दोन महिलांकडे हा साठा आढळून आला असून पोलिसांनी या दोन्ही महिलांना अटक केली आहे. मात्र गेल्या काही काळात शहरात अंमली पदार्थांचा वाढता पुरवठा चिंतेची बाब ठरत आहे. या दोन्ही महिलांना १६ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अंबरनाथ शहरात गेल्या वर्षभरात सातत्याने गांजा विक्रेत्यांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे शहरात गांजा आणि अन्य अंमली पदार्थांच्या आहारी तरुणपिढी जात आहे. त्यात अंबरनाथ येथील कैलास नगर भागात मुंब्रा येथील दोन महिला नशेसाठी वापरण्यात येणारे औषध आणि बटन नावाच्या गोळ्यांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. रूक्साना कासिम शेख (४०) आणि सईदा युसुफ शेख (५२) या मूळच्या मुंब्रा येथील महिला गेल्या काही दिवसांपासून कैलास नगर येथे एका भाड्याच्या घरातून या नशेच्या औषध विक्रीचा व्यवसाय करत होत्या. पोलिसांनी या घरावर धाड टाकत औषधांचा साठा जप्त करत या दोन्ही महिलांना अटक केली आहे. मात्र या महिलांचा साथीदार युसुफ शेख हा फरार झाला आहे. रूक्साना आणि सईदा शेख या दोन्ही महिलांवर यापूर्वीही मुंब्रा आणि अन्य पोलिस ठाण्यांमध्ये एमडीपीएस कायद्यांतर्गत कारवाई केल्याचे पोलिसांनी सांगितले.



या कारवाईच्या वेळी अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारीही उपस्थित होते.

डॉक्टरांच्या परवानगीशिवाय या औषधांचा वापर करता येत नाही, मात्र या महिलांकडे एकूण ३० हजारांहून अधिक किमतीचा या औषधांचा साठा आढळला आहे. त्यामुळे लवकरच शहरातील औषध विक्रेते आणि पुरवठादार यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त सुनिल पाटील यांनी सांगितले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक काशिनाथ चव्हाण, क्राइम पोलिस निरीक्षक नरेंद्र पाटील, औषध निरीक्षक निशिगंधा पष्टे यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

# 'भाजपा सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत वाढ'

**वाडा** : शेतमालाला दीडपट हमीभाव देऊन शेतकरी आत्महत्या रोखू असे म्हणत सत्तेवर आलेल्या भाजप सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली असून या सरकारच्या काळात श्रमनिरास झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत वाढ झाली असल्याची टीका शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथदादा पाटील यांनी वाडा येथे केली.

भारताचा क्र ांतिकारी मार्क्सवादी पक्षाच्यावतीने विविध मागण्यांसाठी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर शुक्रवारी मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी



शेतकरी पाटील यांची विशेष उपस्थिती होती. ते पुढे म्हणाले की, देशातील शेतकरी उत्पादन करण्यात कुठेही कमी पडला आहे. शेतीकरीता आलेले नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करत शेतकऱ्यांनी शेतीचे उत्पादन वाढविले. आज कुठेही भूकबळी पडत नाहीत मात्र शेतकरी आत्महत्या करू लागलेत याला आजवरच्या सरकारांची ध्येयधोरणे जबाबदार असल्याचे ते म्हणाले.

गत कॉंग्रेस सरकारच्या काळात आठ तासाला एक शेतकरी आत्महत्या होत होती. मात्र भरमसाठ अश्वासने देवून सत्तेवर आलेल्या भाजप सरकारच्या काळात हे प्रमाण दोन तासावर आल्याने हे चित्र भयावह असल्याने केवळ कॉंग्रेसला पर्याय म्हणून भाजप आणि भाजपला पर्याय म्हणून कॉंग्रेस अशी निवड करणे धोकादायक ठरले आहे. त्यामुळे येत्या काळात गरीबांचे - शेतकरी- कष्टकरी वर्गाचे सरकार सत्तेवर यावे म्हणून व्यापक प्रबोधनाची गरज त्यांनी व्यक्त केली. आजवरच्या सरकारांनी शहरांमध्ये स्वस्त मजूर हवेत म्हणून शेतकऱ्यांच्या विरोधात धोरणे राबविल्याने शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे. या मारक धोरणाविरोधात सर्व शोषित समाजाने उतरल्याशिवाय सरकारला जाग येणार नाही असे म्हणत भाजप सरकारच्या ध्येयधोरणांवर जोरदार टीका पाटील यांनी यावेळी केली. तर देशात आणि राज्यात सत्तेवर असलेले भाजप सरकार गरिबांच्या विरोधात आहे.

# जागा आडविणाऱ्यांना झाला दंड; रेल्वेकडून १६० प्रवाशांवर कडक कारवाई

***नालासोपारा : लोकलमध्ये जागा अडविणा-या १६० प्रवाशांवर रेल्वेने चार्जशीट दाखल केले असून त्यांना कोर्टाने ५०० ते २०० रूपये दंड ठोठावला आहे, असे रेल्वे सुरक्षा बलाचे प्रमुख डी. एन मल्ल यांनी सांगितले. यामुळे जागा अडविण्याची दादागिरी करणाऱ्या टोळक्यांना आता आळा बसणार आहे.***

त्यासाठी विरार ते बोरीवली दरम्यान चार पथके बनविण्यात आली आहेत. मीरारोड ते बोरीवली दरम्यान पकडलेल्यांवर कलम १५६ नुसार अंधेरी कोर्टात आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यांना रेल्वे कायद्यानुसार ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला. भाईंदर ते विरार दरम्यान पकडलेल्यांना वसई कोर्टात हजर करण्यात आले. त्यांनाही ३०० ते २०० रुपये दंड ठोठावण्यात आला. डहाणू-पालघर



ते वसई-विरार भागातून दररोज लाखो प्रवासी नोकरीधंद्यानिमित्त लोकल ट्रेनने प्रवास करत असतात. मात्र प्रवासादरम्यान दारात उभे राहून प्रवाशांचा मार्ग अडविणे, आपल्या सहकाऱ्यांसाठी डब्यातील सीट राखून ठेवणे, चर्चगेटवरून येणारी विरार लोकल असेल तर अंधेरी, बोरिवली येथील प्रवाशांना उतरू न देणे असे अनेक प्रकार रोज घडत असतात. यातूनच अनेकदा वेगवेगळ्या ग्रुपमध्ये हाणामारीची प्रकारही घडले आहेत. याचा त्रास सर्वसामान्य प्रवाशांना होत असतो. यासाठी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपही तयार करण्यात आले आहेत. रेल्वे सुरक्षा सरांच्या या धडक मोहिमेमुळे सर्वसामान्य प्रवाशांनी स्वागत केले असून, दारात जागा अडवून हवा खाणाऱ्या मुजोर प्रवाशांना आता दादागीरी केल्यास कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. यापूर्वीही अशा स्वरुपाची कारवाई झाली आहे. मात्र तिच्यात सातत्य नसल्याने तिचा प्रभाव फारसा जाणवत नाही त्यामुळे यावेळी तरी ते राखावे, अशी अपेक्षा आहे.

# ठाणे जिल्ह्यावर पाणीकपातीचे संकट

यंदा सरासरीइतका पाऊस पडून जुलै महिन्यातच धरणे तुडुंब भरली असली तरी मंजूर कोटयापेक्षा उचल अधिक असल्याने ऑक्टोबर महिन्यापासूनच ठाणे जिल्ह्यातील शहरांमध्ये पाणीकपात करावी लागणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे ऑक्टोबरच्या उकाड्यातच शहरातील नागरिकांना पाणीकपातीला सामोरे जावे लागणार आहे. पाणीकपात तातडीने लागू होणार असली तरी सणांच्या दिवशी ही कपात शिथिल केली जाणार आहे. जिल्ह्यातील वाढती लोकवस्ती विचारात घेऊन भविष्यकालीन पाणीपुरवठयासाठी प्रस्तावित करण्यात आलेला एकही नवीन धरण प्रकल्प अद्याप मार्गी लागलेला नाही. त्यामुळे पाण्यासाठी संबंधित यंत्रणांना कसरत करावी लागत आहे.

# मोदी सरकारच्या ४ वर्षात भूकबळीत मोठी वाढ, केंद्र सरकार नापास

***नवी दिल्ली - भूकबळी संपविणाऱ्या देशांच्या यादीत भारत आणखी पाठीमागे पडला आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०१८ (GHI) चा अहवाल जारी करण्यात आला आहे. त्यानुसार ११९ देशांच्या यादीत भारत १०३ व्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे गतवर्षी या यादीत भारत १०० व्या स्थानावर होता. त्यामुळे, मोदी सरकार देशातील भूकबळी कमी करण्यात अपयश ठरत असल्याचे दिसून येत आहे.***



केंद्रातील मोदी सरकारला देशातील भूकबळी समस्या आव्हान ठरताना दिसत आहे. कारण, ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये भारत सातत्याने मागे पडत आहे. भूकबळी संपविणाऱ्या देशांच्या या यादीत २०१४ साली भारत ५५ व्या स्थानावर होता. त्यानंतर, सन २०१५ मध्ये हे स्थान ८० पर्यंत जाऊन पोहोचले होते. तर २०१६ मध्ये ९७ आणि २०१७ मध्ये १०० अशी घसरण भारताची झाली आहे. मात्र, यंदा म्हणजेच २०१८ मध्ये भारत या यादीत १०३ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. तर या यादीत पाकिस्तान १०६ व्या क्रमांकावर आहे. पण, ज्या देशासोबत भारत स्पर्धा करतो, तो चीन या यादीत २५ व्या स्थानावर आहे. त्यामुळे गेल्या ४ वर्षांचा अभ्यास केल्यास, देशातील भूकबळी संपविण्यात मोदी सरकारला अपयश आल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

ग्लोबल हंगर इंडेक्सकडून जागतिक, राष्ट्रीय आणि क्षेत्रीय स्तरावरील भूकबळीचे आकलन करण्यात येते. भूकबळी कमी करण्याच्या लढाईतील प्रगती आणि समस्यासंदर्भात दरवर्षी एक सर्वेक्षण केले जाते. देशातील किती नागरिकांना गरजेनुसार जेवण मिळत नाही, याचा अहवाल या संस्थेकडून तयार केला जातो. म्हणजे, देशात किती प्रमाणात कुपोषण आहे, याचा अभ्यास या संस्थेकडून केला जातो. त्यामध्ये ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या किती चिमुकल्यांचे वजन आणि उंची त्यांच्या वयापेक्षा कमी आहे. तसेच यामध्ये बालमृत्यू दर किती, हेही तपासले जाते.

## १ डिसेंबरपर्यंत मोबाईल नंबर रजिस्टर करा
## नाहीतर SBI बंद करेल 'नेट बँकींग' सुविधा


स्टेट बँक ऑफ इंडियाने नुकतीच एक महत्त्वाची घोषणा केली आहे. आपल्या खातेदारांपैकी जे खातेदार इंटरनेट बँकींग सुविधा वापरतात त्यांनी लवकरात लवकर आपला मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर करावा असे आवाहन बँकेने केले आहे. यासाठी बँकेने १ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. असे न केल्यास बँक प्रशासनाकडून ग्राहकांची नेट बँकींग सुविधा बंद केली जाईल असेही बँकेकडून सांगण्यात आले आहे. बँकेने 'ऑनलाइनसेबी' या आपल्या संकेसस्थळावर ग्राहकांना ही माहिती दिली आहे.




आपल्या ग्राहकांना एसएमएसेस आणि इमेल अलर्टसाठी मोबाइल क्रमांक रजिस्टर करायला सांगा, असे निर्देश रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ६ जुलै २०१७ रोजी एका निवदनाद्वारे बँकांना दिले होते. त्या पार्श्वभूमीवर एसबीआयने आपल्या ग्राहकांना ही सूचना दिली आहे. सध्या व्यवहार ऑनलाईन झाल्यापासून ग्राहकांकडून नेटबँकींगचा मोठ्या प्रमाणात वापर होते. ऑनलाईन व्यवहार करताना कोणतेही गैरप्रकार घडू नयेत म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव बँकेने या नियमाची अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे. यासाठी ग्राहकांनी आपले खाते असलेल्या शाखेशी संपर्क करणे आवश्यक असल्याचेही बँकेने म्हटले आहे.

**आपला मोबाईल क्रमांक रजिस्टर आहे की नाही असे तपासा**

**१. www.onlinesbi.com वर जाऊन लॉगइन करा**
**२. My Account and Profile वर जा**
**३. यातील Profile वर जा**
**४. यात Personal Details मध्ये मोबाईल या पर्यायावर क्लिक करा.**
**५. तुम्हाला प्रोफाईल पासवर्ड मागितला जाईल. हा लॉगइन पासवर्डपेक्षा वेगळा असेल.**
**६. योग्य पासवर्ड टाकल्यावर तुम्हाला तुमचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी दिसेल.**



## ओडिशात भूस्खलनाने १२ मृत्युमुखी




**भुवनेश्वर : ओडिशात गजपती जिल्ह्यात तितली चक्रीवादळानंतर झालेल्या मुसळधार पावसाने भूस्खलन होऊन किमान १२ जण मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच चार जण बेपत्ता आहेत.**

विशेष मदत आयुक्त बी.पी. सेठी यांनी सांगितले की, शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर काही ग्रामस्थ एका गुहेसारख्या जागेत आश्रयाला थांबले होते. गजपती जिल्ह्याच्या बरघारा गावात झालेल्या या दुर्घटनेत भूस्खलन होऊन १२ जण मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त होत आहे. बेपत्ता चार जण ढिगाऱ्याखाली असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, घटनास्थळी एनडीआरएफच्या टीमला पाठविण्यात आले आहे. तथापि, अन्य भागात पाणी ओसरु लागल्याने मदतकार्याला वेग आला आहे. मुख्यमंत्री नवीन पटनायक गंजम, गजपती आणि रायगड जिल्ह्यासह अन्य प्रभावित भागांची हवाई पाहणी करणार आहेत.

सेठी यांनी सांगितले की, आतापर्यंत १,२७,२६२ नागरिकांना शिबिरांत आश्रय देण्यात आला आहे. एनडीआरएफ आणि ओडिशा डिझास्टर रॅपिड ॲक्शन फोर्सला मदतीसाठी तैनात करण्यात आले आहे. पुराचा फटका गंजम, गजपती, रायगड, पुरी, कंधमाल आणि केंद्रपाडा जिल्ह्यांना बसला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खुनाचा कट; पोलिसांना पत्र



**दिल्ली** : माजी पंतप्रधान राजीव गांधींप्रमाणेच पंतप्रधान नरेंद्र मोदींची नोव्हेंबर २०१९मध्ये हत्या करण्याची धमकी देणारं ईमेल दिल्लीच्या पोलीस कमिश्नरांना मिळालं आहे. या मेलमुळे खळबळ माजली असून देशभरातील सर्व सुरक्षा यंत्रणांना हाय अॅलर्ट देण्यात आला आहे. दिल्लीचे पोलीस कमिश्नर अमुल्य पटनायक यांना शुक्रवारी संध्याकाळी हा मेल मिळाला आहे. या मेलमध्ये मोदींना ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेरंबदूर येथे प्रचारसभेत १९९१ मध्ये ज्याप्रकारे हत्या करण्यात आली होती त्याचप्रकारे मोदींचीही एखाद्या रॅलीत हत्या करण्याचा कट शिजतो आहे. हा मेल पोलिसांना आसाममधून आल्याची माहिती मिळाली आहे. हा मेल करणाऱ्याचा तपास सुरू आहे. येत्या दोन महिन्यांत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदी मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये अनेक प्रचार सभांना संबोधित करणार आहेत. त्यामुळे त्यांचा सुरक्षेतही लक्षणीय वाढ करण्यात येणार आहे.

याआधी कोरेगाव भीमा प्रकरणाचा तपास करत असताना देखील अशाच आशयाचं पत्र पोलिसांच्या हाती लागलं होतं. त्याप्रकरणी अनेक विचारवंतांना अटकही करण्यात आली होती.

## धक्कादायक! सुरक्षारक्षकानेच न्यायाधीशाची पत्नी आणि मुलावर केला गोळीबार

**गुरुग्राम** – सत्र न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश कृष्णकांत शर्मा यांच्या पत्नी आणि मुलावर सुरक्षारक्षकानेच भर बाजारात गोळ्या झाडल्या. या गोळीबारात पत्नी आणि मुलाचा मृत्यू झाला आहे. आरोपी सुरक्षारक्षकाला अटक करण्यात आली आहे.

महिपाल असं आरोपीचे नाव असून तो गेल्या दोन वर्षापासून न्यायाधीश कृष्णकांत शर्मा यांच्याकडे सुरक्षारक्षक म्हणून तैनात होता. न्यायाधीश कृष्णकांत शर्मा यांच्या पत्नी रितू (वय ३७) आणि मुलगा ध्रुव (वय १८) हे दोघे दुपारी तीनच्या सुमारास सेक्टर ५१ मधील आर्केडिया मार्केटमध्ये औषध खरेदी करण्यासाठी गेले होते. कृष्णकांत यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेला हेड कॉन्स्टेबल महिपाल यावेळी त्यांच्यासोबत होता. न्यायाधीश कृष्णकांत हे एका बैठकीत व्यस्त होते. त्याचवेळी त्यांच्या मोबाईलवर



सुरक्षारक्षकाने कॉल केला व 'तुमच्या पत्नी आणि मुलावर मी गोळ्या झाडल्या आहेत. जा आणि त्यांना पाहा', असं सांगितलं.

महिपालने रितू आणि ध्रुववर भर बाजारात गोळ्या झाडल्या. बाजारात बरीच वर्दळ होती. परंतु, गोळीबारानंतर कोणीही समोर आले नाही. सुरक्षारक्षक हा पोलिसाच्या गणवेशात होता. या घटनेचा एक व्हिडिओ सुद्धा समोर आला आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या ध्रुवला आरोपी महिपाल कारमध्ये टाकण्याचा प्रयत्न करताना दिसतोय. परंतु, यात तो यशस्वी न झाल्याने त्याला तेथेच टाकून कार घेऊन पळून गेल्याचेही दिसत आहे. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. आरोपी महिपाल यानं हे कृत्य का केले याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. आरोपी हा मानसिक रुग्ण आहे का? याचा तपास पोलीस करीत आहे. पोलिसांनी आरोपी महिपालला अटक केली असून त्याने ज्या बंदुकीनं गोळ्या झाडल्या ती बंदुकही पोलिसांनी जप्त केलीय.

## फेसबुकच्या ३ कोटी युजर्सचा डेटा लीक




केंब्रिज ॲनालिटीकाच्या डेटा चोरी प्रकरणानंतर फेसबुक चांगलंच वादात सापडलं होते. हे प्रकरण शांत होते ना होते तोच फेसबुकसमोर आणखी एक मोठी अडचण उभी राहिली आहे. फेसबुकच्या २ कोटी ९० लाख युजर्सचा डेटा हॅकर्सने चोरल्याची माहिती समोर आली आहे. फेसबुकनेही या वृत्ताला दुजोरा दिला असून एफबीआय याप्रकरणी पुढील तपास करत आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यातही ५ कोटी अकाऊंटसची माहिती लीक झाली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा माहिती लीक झाल्याने फेसबुक वापरणे धोक्याचे असल्याचे समोर आले आहे.

केंब्रिज ॲनालिटिका प्रकरणात युजर्सचा डेटा चोरून त्याचा गैरवापर केल्याचेही समोर आले होते. त्यानंतर अशाप्रकारे जगभरातील कोट्यवधी लोकांची माहिती लीक होत असेल तर हे नक्कीच धोक्याचे असल्याचे समोर आले होते. या सर्व प्रकरणावरुन फेसबुकचा सीईओ मार्क झुकरबर्ग याने युजर्सची जाहीर माफीही मागितली होती. युजर्सची नाव, पत्ता अशी प्राथमिक माहिती चोरीला गेल्याचे समोर आले होत. तर आता १ कोटी चाळीस लाख युजर्सची फेसबुक प्रोफाइलवर असणारी वैयक्तिक माहिती चोरीला गेल्याचे बोलले जात आहे. याआधी झालेल्या हॅकींगमध्ये 'View As' या फिचरच्या माध्यमांतून हॅकर्सने माहिती चोरली आहे. सुरक्षेचा विचार करून फेसबुकने 'View As' हे फिचर काढून टाकले आहे. हॅकर्सने 'View As' या फिचर्सच्या माध्यमांतून एक्सेस टोकन चोरले होते.

## UN मानवाधिकार परिषदेवर भारताचा मोठा विजय



भारताने संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेच्या सदस्यत्वाची निवडणूक मोठ्या मताधिक्क्याने जिंकली आहे. या सदस्यत्वाचा कार्यकाळ १ जानेवारी २०१९ पासून ३ वर्षांसाठी असणार आहे. आशिया प्रशांत क्षेत्र गटात भारताने सर्वाधिक १८८ मते मिळवून हा दणदणीत विजय मिळवला आहे. संयुक्त राष्ट्राच्या १९३ सदस्यीय आमसभेने मानवाधिकार परिषदेवरील नव्या सदस्यांच्या निवडीसाठी निवडणूक जाहीर केली होती. गुप्त मतदानाने ही निवडणूक पार पडली. त्यात निवडून येण्यासाठी किमान ९७ मतांची आवश्यकता होती. दरम्यान, आशिया प्रशांत क्षेत्र गटात भारताशिवाय बहरिन, बांगलादेश, फिजी आणि फिलिपाइन्स या देशांनीही दावेदारी सांगितली होती.

## बनावट गुणपत्रिकांचे रॅकेट उध्वस्त?

**रत्नागिरी:** रत्नागिरीतील फिनोलेक्स कॉलेजच्या एका विद्यार्थ्याने बनावट गुणपत्रिका सादर करून प्रवेश मिळवल्याप्रकरणी, हा विद्यार्थी व मुंबई विद्यापीठाच्या एका कर्मचाऱ्यासह सहा जणांना रत्नागिरी ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. अटकेतील आरोपींमध्ये मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्याचा समावेश असल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. दरम्यान, बनावट गुणपत्रिकांचे मोठे रॅकेट मुंबई विद्यापीठात कार्यरत असण्याचा पोलिसांचा कयास असून पोलिसांना या तपासाची व्याप्ती वाढवली आहे.

फिनोलेक्स कॉलेज या नामवंत कॉलेजमध्ये सुयश शेट्ये या विद्यार्थ्याने २०१५ मध्ये मेकॅनिकल इंजिनीअरिंग अभ्यासक्रमात प्रवेश घेतला होता. द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी नियमानुसार आवश्यक विषयांत उत्तीर्ण न झाल्याने त्याने विद्यापीठाकडे रिचेकिंगसाठी अर्ज केला होता. त्यानंतर त्याने विद्यापीठ कर्मचाऱ्यांशी संधान बांधून रिचेकिंगमध्ये उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका सादर केली. मात्र याबाबत संशय आल्याने फिनोलेक्स कॉलेजने गुणपत्रिका विद्यापीठाकडे पडताळणीसाठी पाठवली. मात्र विद्यापीठाने पडताळणी होत नसल्याचे कळवून संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना केल्या. याबाबत कॉलेजचे प्रा. संजय बाबुराव कुलकर्णी यांनी ग्रामीण पोलिसांकडे तक्रार केली होती. यानंतर पोलिसांनी तपास करत एकूण सहा संशयितांना अटक केली.




अटक केलेल्यांमध्ये विद्यार्थी सुयश उदय शेट्ये याच्यासह गोरखनाथ गायकवाड, गणेश मुणगेकर, प्रवीण वारीक, महेश रामचंद्र बागवे आणि दिनेश विश्वनाथ हळदणकर यांना अटक केली. यापैकी चार जणांना मुंबईतून विविध ठिकाणांहून अटक करण्यात आली. अटक झालेल्यांपैकी गणेश मुणगेकर हा मुंबई विद्यापाठाचा कर्मचारी आहे. इतर आरोपींची कसून तपासणी सुरू आहे.

## ड्रायव्हिंग लायसन्स आणि आरसी देशभरात एकसारखेच?

**नवी दिल्ली** – येत्या जुलैपासून देशातील सर्व राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात ड्रायव्हिंग लायसन्स (वाहन परवाना) आणि गाडी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (नोंदणी प्रमाणपत्र) एकसारखेच असणार आहेत. त्यांचा रंग, लूक आणि डिझाईन तसेच सिक्युरिटी फिचर्स सर्व काही एकसारखेच असणार आहेत. या ड्रायव्हिंग लायसन्स आणि आरसीमध्ये मायक्रोचीप आणि क्यूआर कोड सुद्धा असणार आहेत.




ड्रायव्हिंग लायसन्स आणि आरसी हे मेट्रो आणि एटीएम कार्डसारखे नियरफील्ड कम्युनिकेशन (NFC) असणार आहेत. ट्रॅफिक संदर्भात कोणतीही माहिती किंवा सूचना या नव्या कार्डद्वारे लवकर मिळू शकतील. दिव्यांग चालकांसाठी खास डिझाईन बनवण्यात आली आहे. प्रदुषण नियंत्रणासंदर्भात सर्व माहिती ही आरसी बुकमध्ये असणार आहे. रस्ते व परिवहन मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने या संदर्भात माहिती दिलीय. जर एखाद्या व्यक्तीला प्रदुषणासंबंधी चाचणी करायची असेल तर त्याला गाडी मालकांची परवानगी घ्यावी लागत होती, परंतु, आता त्याची गरज नाही, असंही या अधिकाऱ्याने सांगितले. देशात दररोज ३२००० ड्रायव्हिंग लायसन्स दिले जातात किंवा त्यांचे नुतनीकरण केले जाते. देशभरात दररोज ४३००० गाड्यांची नोंदणी केली जाते. या नवीन ड्रायव्हिंग लायसन्समुळे १५ ते २० रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार आहे. ट्रॅफिक पोलिसांनी कार्डमधील नवीन क्युआर कोड स्कॅन करताच त्यांना गाडी चालकाची सर्व माहिती मिळू शकणार आहे.

गुजरात हिंसाचार : कामावरुन घराकडे निघालेल्या बिहारी तरुणाची हत्या

अहमदाबाद - गुजरातमध्ये एका बिहारी तरुणाची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. गुजरातच्या गया येथील केडिया गावात अरमजीत नावाचा हा मूळचा बिहारी युवक राहात होता. शुक्रवारी रात्री कामावरुन घरी परत येत असताना, काही अज्ञातांनी अमरजीतवर लोखंडी रॉडने हल्ला करत त्याला ठार केले. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली असून गुजरात हिंसेचाचा हा भाग असल्याचा आरोप अमरजीतच्या कुटुंबीयांनी केला आहे.

गुजरातच्या सांबरकांठा जिल्ह्यात बिहारमधील एका युवकाने १४ महिन्यांच्या चिमुकलीवर बलात्कार केला होता. त्यानंतर, गुजराती लोकांनी येथील उत्तर भारतीयांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. तसेच उत्तर भारतीय नागरिकांना, मूळतः बिहार आणि उत्तर प्रदेशातील रहिवाशांना पिटाळून लावले. या हिंसाचारामुळे जवळपास २० हजार उत्तर भारतीयांनी गुजरातमधून पलायन केलं आहे. याप्रकरणी आत्तापर्यंत पोलिसांनी ४३१ जणांना अटक केली असून ५६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे, बिहारमधील युवकाच्या मृत्युलाही ही घटनाच कारणीभूत असून त्यातून तरुणाची हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.




**हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)**